# रेशिमधारा

पहिली आवृत्ती

संपादक : सिद्धि चव्हाण
https://siddhic.blogspot.com
siddhic1991@gmail.com





# मनोगत

'नेमेची येतो मग...' या ओळीप्रमाणे त्याने नेहमीच यावे. न चुकता, न विसरता, चिंब होऊनी बरसावे. धुंद-बेधुंद करुनी या देहाला, सृष्टिनेही नववधुपन ल्यावे. हा नाविन्याचा अन चैतन्याचा हिरवा ऋतू. नव जीवन, नवी पालवी, नविन उमेद, नवा मोद, नवा हर्ष घेऊन येणारचं... वर्षानुवर्षे!

हे सगळे बदल कितीही नवे असले तरिही, हे सगळे बदल आपल्याला कितीही हवे असले तरिही... हा आनंदघन, हे मेघ, हा पाऊस जेव्हा जेव्हा बरसतो, तेव्हा तेव्हा आपली एक तरी जुनीच आठवण पुन्हा-पुन्हा नव्याने जागी करत असतो. माझ्या बाबतीत तरी असेच होते... दरवर्षी!

जीवनावस्थेच्या प्रत्येक टप्प्यात अश्याच बरसून गेलेल्या धुंद पावसाच्या आपल्या काही गोड अश्या आठवणी मागे सुटलेल्या असतात. तर काही कटू आठवणींच्या दोऱ्या तुटलेल्या असतात.
चला तर मग,
आठवांचे पेले रिते करुया ! अन या बहराच्या ऋतूचे थेंब धरुया !
थेंब ओंजळीतून सुटत जातील, अन आठवणी आपसुकच माळरानी उमटत जातील.

पाऊस म्हणजे प्रेमाचा ऋतू. या पावसाचं प्रेमाशी आणि प्रेमाचं आठवणींशी युगायुगांचं अस एक गोड नातं आहे. हा पाऊस आला की रघूला त्याची 'मीरा' आठवते. मनूला 'कपाशी' आठवते. घनाला दुर गेलेली 'वर्षा' बोलावते. पिनीची या पावसातली एक गंमत आहे. तर अप्पांना 'माईला' भेटण्याची आस लागते.
निवडक रेसिपीज सह पावसाळी प्रेमाच्या, त्यागाच्या, जिव्हाळ्याच्या, अन विरहाच्या आठवणी, कथारुपाने आणि कविता रूपाने, घेऊन येत आहे, हा पावसाळा ई-विषेशांक... **रेशिमधारा.**

- सिद्धि चव्हाण

सगळ्यांना या पावसाळ्याच्या तुडुंब भरलेल्या, यथेच्छ अशा चिंब-चिंब शुभेच्छा!!

# निवडक पावसाळी आठवणी


| अ. क्र. | क्रम | | पृष्ठ क्रम |
|---|---|---|---|
| १ | श्रावणधारा {कथा} | - सिद्धि चव्हाण | ४ |
| २ | एक पाऊस मनातला {कविता} | -अर्चना गवस/चौधरी | १६ |
| ३ | कपाशीचा पाऊस {कथा} | - सिद्धि चव्हाण | १७ |
| ४ | तो पावसाळा {कविता} | - अरुणा धनंजय विचारे | २३ |
| ५ | जाई! {कथा} | - सिद्धि चव्हाण | २४ |
| ६ | मला पाऊस खूप आवडतो {कविता} | - अर्चना गवस/चौधरी | २७ |
| ७ | थोडं तुझं थोडं माझं {कथा | - सिद्धि चव्हाण | २८ |
| ८ | पॉम्फ्रेट तिखलं {रेसिपी} | - सिद्धि चव्हाण | ३३ |
| ९ | मिरगाचा पाऊस {कथा} | - सिद्धि चव्हाण | ३४ |
| १० | बेसन झुणका {रेसिपी} | - सिद्धि चव्हाण | ३८ |




# श्रावणधारा

'यार तिला बघून माझे फ्रेंड्स काय म्हणतील? अगदी टिपिकल...केवढी आऊटडेटेड आहे. शीट्टsss, शॉनला सांगत होतो एकटाच गाडी घेऊन ये. त्या निक्याला घेऊन येऊ नकोस, तर सोबत अजून पॅम. सो ऑकवर्ड. सगळ्यांसमोर हसे होणार? राघवच्या मनात एक ना हजार प्रश्न उभे होते. अखेर ईन्टरनॅशनल एअरपोर्ट सेकंड गेटने मीरा बाहेर पडली. आपली बॅग रोलिन्ग करत तिने दुरुनच हात दाखवला, इकडे पठ्ठ्या पाच मिनिटे फुल टू कन्फ्युज.

'हिच का ती? काय वेडसर दिसत होती लग्नात... हिरवागार चमकीचा चापुन-चोपून नेसलेला शालू... ती आजी-पणजीच्या काळातली नाकापेक्षा जड भली-थोरली नथ... डोक्यात उजवीकडे खोचलेली ढिगभर गुलाब-मोगर्याची फुल. पण तरीही मला ती आव...'

"रघु! तिचं का रे मीरा?" निक्याच्या प्रश्नाने राघव भानावर आला आणि त्याच्या मनातलं अर्धवट वाक्य मनातच विरून गेलं.

"ह... हो!" मिनिटभर तो तिच्याकडे टक लावून उभा होता, आणि तोपर्यंत ती अगदी त्याच्या समोर येऊन उभी. पिचक्रिम निलेन्थ कोट. केसाचा मस्त हायबन. कानात व्हाईट स्टोनचे रिंग आणि चेहऱ्यावर नेहमीचीच अतीव शांतता. पॅम, आणि निक्याच आत्तापर्यन्त शेकहॅन्ड देखिल करुन झाल होत. राघव मात्र अजूनही थोडा साशंक.

"निघायच का?" त्याच्याकडेच बघत मीराने विचारले, आणि हायहॅलो अशी जुजबी फॉर्मालिटी करुन ते निघाले.

'लग्नामध्ये... त्याआधी दोनदा पाहिलेली आणि आपण आत्ता पाहतोय ती मिरा, केवढा तरी फरक आहे.' घरी येईपर्यंत हाच विचार त्याच्या मनात ठाणं मांडून होता.

*****

एक वन बिएचके, पण अगदी आलिशान फ्लॉट. बऱ्यापैकी स्वच्छता होती. मोजकेच साहित्य, निटनेटकी ठेवलेली एक-एक गोष्ट मीरा निरखून पहात होती. पहिल्यादा इथे आली होती. तिच्यासाठी हे सारं काही नविन.

"गुडमॉर्निंग! कॉफी?" एक कॉफीमग समोरच्या टेबलावर ठेवत राघव खुर्चीवर येऊन बसला.

"हो. आले." ओल्या केसांवरचा टॉवेल तिथेच बाजूच्या खुर्चीवर टाकत मीराने कॉफीमग हातात घेतला.

"काल इथे पोहोचेपर्यंत फारच रात्र झाली होती, म्हणुन काही विचारता आल नाही. कसा झाला प्रवास? " राघवने तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात विचारले.

"हं... छान. कॉफी छान आहे." बाजूच्या खुर्चीवर बसत मीरा उत्तरली.

"थॅक्स. ब्रेकफस्टसाठी काय ऑर्डर करु. ऑक्चुअली मिसेस फेलीस चार दिवस येणार नाही आणि मला फारस काही जमत नाही, इथे तेवढा वेळ सुद्धा नसतो म्हणा. सो बाहेरुन मागवतो. वेज या नॉनवेज, केक्स मफिन्स वगैरे काही? "

"वेज काहीही चालेल. घरी कुकीज किवा बिस्किटस असेल तर ते ही चालेल... म्हणजे ऑर्डर करण्याची गरज नाही." हातातल्या कपच्या काठावर बोट फिरवत मीरा वरती न बघताच म्हणाली.

'काय फॉरमल डिस्कशन चाललय... नॉनसेन्स, आणि ही तर एक-एक शब्द एवढा विचार करुन बोलते की बास रे बास! बोर होणार घरी आज, त्यापेक्षा ऑफिसमध्ये गेलो असतो. ' राघवच्या मनात अनेक विचार येऊन गेले आणि ते क्षणार्धात कुठल्या कुठे वीरूनही गेले. कारण तोपर्यंत मीराने बॅगमधून काढलेला जाडजूड पेपर्सचा एक बंच त्याच्यासमोर ठेवला होता.

"हे बाबांनी दिलेले सगळे लिगल डॉक्युमेन्टस, आणि बाबांनी जाण्याआधीच काही दिवस हे लेटर माझ्याकडे दिल होत. तुम्हाला द्यायला."

एक पॅकबंद खाकी लेटर त्याच्याकडे करत ती परत येऊन खुर्चीवर बसली. लेटर हातात घेतल्या क्षणी राघवच्या डोळ्यात जमा झालेले पाणी तिच्या नजरेतून सुटले न्हवते. खरं तर तिची ही अवस्था वेगळी नव्हती, पण कोणत्याही परिस्थितीत स्वतःला सावरण्याचं तंत्र तिला चांगल अवगत होत.

"त्यादिवशी मला अचानकच त्यांचे आवडते उकडीचे मोदक आणि लाप्शीची खीर करायला सांगितली... पोटभर खाऊन ही झाल, आणि...आणि अचानक हसत खेळत त्यांनी निरोप घेतला... कायमचाच. अगदी अनपेक्षित. आयुष्य असावं तर असं. कोणी म्हणणार सुद्धा नाही, की त्याना कधी पॉरालिसिस होता. फक्त सारखी तुमची आठवण काढायचे. तरिही अजिबात अट्टाहास नाही की तुम्ही त्यांना पहायला यावंच."

ती मिनिटभरात सार काही बोलुन गेली होती, जे ऐकण्यासाठी राघव अगदी आतुर होता.

"मी खुप प्रयत्न केले, पण या ऑफिसच्या फॉरमेलीटीज काही केल्या संपेनात. हे लोक सोडायला तयार न्हवते. इकडे सगळचं प्रॅक्टीकली... इमोशन्सना काहीच जागा नसते. त्यामुळे मी शेवटच्या क्षणी सुद्धा पोहोचू शकलो नाही." बोलता-बोलता राघवचे डोळे भरले.

"इट्स ओके. जवळचे सगळेच नातेवाईक आले होते, त्यामुळे सगळ्यांचा आधार मिळाला, सार काही व्यवस्थित पार पडल आणि तुमचा सुद्धा नाईलाज होता म्हणा. काही गोष्टी अटळ असतात हेच खरं. "

तिच्या नकळत तिने राघवच्या हातावर आपल्या उजव्या हाताने थोपटले, आणि तोच हात हातात घेऊन तो ही मनसोक्त रडला.  पुरुषासारखा पुरुष असं ओक्साबोक्सी रडताना पाहून मीराला गहिवरुन आलं होत.

" मीरा थ्यॅक्स. ॲटलिस्ट तू तरी शेवटच्या क्षणापर्यंत त्यांच्या सोबत होतीस. "    तो थोड स्थिर होत कसबस बोलला.

" माय प्लेजर."     बोलत मीरा त्याच्या हातातील आपला हात अलगद सोडवून तिथून उठली, रिकामे कॉफीमग हातात घेऊन किचनकडे जायला वळली. दोन क्षण तिने आपल्या हाताकडे पाहीले. दुखऱ्या नसेवर कोणी बाम लावावा, आणि तिथे एक असह्य्य कळ उठावी तशी तिची अवस्था झाली होती. अश्या वेळी बरही वाटत असत आणि त्याबरोबर होणारा तो दाह सहनही होत नाही.

*****

ते पेपर्सच बंडल हातात घेऊन कितीतरी वेळ राघव बाबांच्या आठवणी आळवत बसला होता. लहानपणी पासून ते अगदी इथे येई पर्यंत... शेवटची भेट झाली त्याला जेमतेम एक वर्ष सरत आले होते. त्यानंतर भारतात जाणे झालेच नाही.  मीराने नकळत त्याच्या आत दाबलेल्या मुक अश्रूंना वाट करुन दिली होती. एवढं  मनसोक्त रडायला सुद्धा त्याला कधी मिळाल नाही.

‘अरे हो मीरासाठी ब्रेकफस्ट ऑर्डर करत होतो ना. विसरलोच.’   म्हणत राघव उठला आणि तो ही किचनकडे वळला.

"सॉरी मीरा थोड लेट होईल, ते ऑर्डर करायच राहुन गेल. लगेच कर..."   पण वाक्य पुर्ण करायची देखिल गरज उरली नाही.  मसाला नुडल्सचा दरवळ किचनमध्ये पसरला होता. आणि मीरा खिडकीतल्या पावसाकडे एकटक लावून उभी होती.  राघव जवळ येऊन तिच्याशी काहीतरी बोलतोय याचे देखिल तिला भान न्हवते.  उतू जाऊ पाहणाऱ्या कॉफीचा गॅस बंद करुन राघव बाजूला शांत उभा होता.  जणू बाहेरचा पाऊस मोजणारी मीरा आणि तोच पाऊस तिच्या डोळ्यात मोजणारा राघव दोघे कितीतरी वेळ तसेच उभे होते. दोन मिनिटे...पाच मिनिटे... दहा मिनिटे झाली असतील.

"मीरा!"   गॅसकडे आणि तिच्याकडे आळीपाळीने पाहत त्याने पुन्हा आवाज दिला.

"ह. हो. विसरलेच."    म्हणत तिने गॅस बंद करत, लगोलग दोन नुडल्स डिश आणि सोबत कॉफीचे मग भरायला सुरुवात केली.

"ते मघाशी ऑर्डर करायच राहून गेल."  कॉफीमग हातात घेत तो ही तिच्यामागून टेबलकडे वळला.

"हो ते माझ्या लक्षात आल होत. मी देखील लगेचच बाबांचा विषय काढायला नको होता. मग हे नुडल्स पॅकेटस फ्रिजमध्ये पाहीले, आणि करायला घेतले. चालेल ना? "   मीरा एक डिश त्याच्याकडे सरकवत म्हणाली.

"हो. ॲक्चुअली पळेल."    म्हणत तोही समोर बसला.

"बाय द वे, यु आर सो मच चेंज्ड, आय मीन, या आधी पाहिलं ते फक्त साडी वगैरे मध्ये, तेव्हा तू खूप वेगळी दिसत होती."

"आधी म्हणजे फक्त हळद, साखरपुडा आणि लग्नात...अश्या प्रसंगी अजून तरी आपल्याकडे साडीच घालतात हं. सगळं पारंपरिक असत ना. संस्कृतीला प्राधान्य दिल जात अश्या वेळी. त्याआधी आणि त्यानंतर आपण परत केव्हा भेटलोच नाही."

"होय. ते आहेच."   राघव आपला चेहेरा अगदीच गंभीर करत म्हणाला.

"तेव्हा कुठे असं वनपीस आणि शॉर्टड्रेसेस घालणार? लोकं हसले असते ना."    म्हणत मीराने ती गोष्ट हसण्यावर घेतली.  त्यामुळे निर्माण झालेले गंभीर वातावरण देखील खेळीमेळीत परिवर्तित झाले होते.

त्यापुढे मात्र राघवला कोणताही विषय वाढवण्याची इच्छा होईना, आणि मीराही कॉफी एन्जॉय करत शांतपणे तिच्या रिकाम्या आणि पोकळ भूतकाळात गढून गेली. नुकताच पडून गेलेल्या पावसाने एक छानसा उल्हास आणि किंचितसा गारवा हवेत पसरला होता.

'तिच्या केव्हाच न पाहिलेल्या नानावीध रंगछटा अगदी निरखून पाहत तिच्या त्या ओल्या केसात गुंतलेली त्याची नजर...आणि त्याला एवढ्या जवळून केव्हा पाहीलेलच नाही आणि खरंतर कधी हिम्मतही झाली नाही, म्हणून उगाच काहीतरी शोधण्यात कॉफीवर झुकलेली तिची नजर... एक अव्यक्त जुनीच कहानी घेऊन आली होती पण पुन्हा नव्याने.'

*****

"लंचसाठी बाहेर जाऊया? की काही ऑर्डर करु?"

"मी लंचसाठी नसेन कदाचीत. ईन्स्टिट्युटला थोड काम आहे, वेळ आहेच तर तिथे जाऊन येईन म्हणते."

"ओके... थॅंक्स. तू हे सगळ घेऊन इथे आली त्यासाठी, आय मीन बाबांच्या भेट वस्तू आणि ते पेपर्स वगैरे..."

"त्यांनी तसं बजावलच होत मला, ' स्वतः घेऊन जा म्हणून '.  तेव्हा मी म्हणाले होते, कुरिअर करते.  बापरे! केवढे रागवले होते ते माझ्यावर. म्हणाले होते, ' "अगं एवढ्या महत्वाच्या जपून ठेवलेल्या वस्तु आणि ते पेपर्स कुरिअर मध्ये गहाळ झाले तर? परत आणून देणार आहेस का! तू स्वतः जा आणि दे त्याला."

खर सांगायच तर, गारवानला माझ देखिल महत्वाच काम आहेच. दोन्ही गोष्टी साध्य झाल्या. नाहीतर मी एवढ्या लांब येण कठीण, आणि बाबांची तेवढीच शेवटची इच्छा अपूर्ण रहायला नको."

बाबा हे म्हणायचे... असे रागवायचे... त्यांना हे सावडायच आणि हे नाही. वगैरे-वगैरे किततरी गोष्टी. तो प्रसंग अगदी समोर घडत असावा अश्या हावभावात मीरा बाबांच्या आठवणी सांगत होती.

"बाकी तिथे कसं काय चालू आहे? सदाकाका वगैरे कोणी येतात का? "   विषयांतर म्हणून राघवने सहजच प्रश्न केला.

"कोणीही येत नाही...कोणी जात नाही. एवढं मोठं घर सांभाळायला कोणीतरी पाहिजे ना, म्हणून भागिताईंना कामाला ठेवून घेतलय, आणि मी आहेच... दोघी असतो. बाबा होते तेव्हा एकट्यानंच्याच  आवाजाने घर नुसतं गजबजलेल असायच, आणि आता फक्त भयान शांतता... "    बोलता बोलता ती अचानक स्तब्ध  झाली.

“मी निघते, ते सेशन चालू व्हायच्या आत पोहोचल पाहीजे, नाहीतर लेट होईल,  एवढ्या लांबून येऊनही काही फायदा होणार नाही. आणि महत्वाच म्हणजे ते प्रॉपर्टी पेपर्स वगैरे वाचून घ्या. जमेल तसं सह्या सुद्ध्या करुन ठेवा. लवकरच परत जायला निघेन म्हणते, तेव्हा गडबड व्हायला नको ना म्हणून.”

उसण हसू चेहऱ्यावर आणून ती तयारीला सुद्ध्या लागली होती. इकडे राघव परत विचारात पडला.

'ही लवकरच परत जाणार तर. थांबवलं तर थांबेल का? तिच्याशी खूप काही बोलायच आहे. सगळ्यात आधी सॉरी म्हणायच आहे. मी जे वागलो...ते चुकीचच होत, एक्सेप्ट कराव लागेल. सार सार काही एक्सेप्ट कराव लागेल. जमल तर तिला मुक्त कराव लागेल, किंवा तिच्या माझ्या नात्याला एक नवीन वळण द्यावं लागेल अर्थातच तिच्या इच्छेनुसार निर्णय घ्यावा लागणार आहे. या सगळ्यामुळे तिच्या आयुष्याची झालेली फरपट आता पुरे.'

काहीतरी मनाशी पक्क करुन तो ऊठला.

"मीरा मी ड्रॉप करतो तुला. रेडी झाली की सांग."

"थँक्स, पण मी एकटी जाऊ शकते."    म्हणत मीराने पर्स आणि मोबाईल उचलला, पाहते तर समोर राघव. हातात गाडीची चावी घेऊन उभा... आता नाही किवा हो म्हणण्याचा प्रश्न उरला नाही. त्यामुळे काहीही न बोलता ती ही त्याच्या बरोबर निघाली देखील.

*****

हातातल्या घड्याळाकडे पाहत पाहत राघवने तिसऱयांदा फोन डायल केला होता.

"मीरा इट्स ११:३०... स्टील आय एम वेटिंग. यु आर लेट. "

"ते मला अजून लेट होईल बहुतेक.  इकडे खुप पाऊस आहे. तुम्ही डिनर करून घ्या मी इथून काहीतरी खाऊन येते."

"मी येतो तिथे, तुला पीक करायला? मग बाहेर जेवून घेऊयात. लोकेशन पाठव. "

"नाही...नको... मी इथेच समोर आहे... येते मी. येते."     पुसटसे कसेबसे दोन शब्द मीराच्या तोंडून बाहेर पडले.

"मीरा बाहेर पाऊस आहे. निघालोच मी, लोकेशन पाठव."   म्हणत राघवने फोन ठेवला आणि तो तडक निघाला. मीराचा फोनवरचा आवाज अगदी हळवा आणि कापरा आला होता. त्या वरुन त्याने ओळखले होते की, काहीतरी प्रॉब्लेम आहे.

आता त्याला लोकेशनची वाट पाहण्याची सुद्ध्या उसंत न्हवती. पाचएक मिनिटे गाडी चालवली नसेल एवढ्यात करकचून लावलेल्या ब्रेकने गाडी जागच्या जागी उभी केली होती. हेड लाईट आणि कर्कश हॉर्नच्या आवाजाने गाडीसमोरच उभी असलेली मीरा ही कावरीबावरी झाली होती. तिच्यापेक्षा जास्त शॉकमध्ये असलेला राघव गाडीमधुन विजेच्या वेगाने तिच्या दिशेने पळत सुटला.

"मीरा वॉट हॅपन्ड?"

तिचा तो व्हाईट ड्रेस पार भिजून गेला होता.  हातातली एवढीशी पर्स सुद्धा तिचाने व्यवस्थित सांभाळता येईना. नीटसं उभही राहण्याची ताकद न्हवती. राघवला काहीही समजेनास झालं. दोन मिनिट तर तो तिच्याकडे प्रश्नार्थक नजरेने बघतच राहिला. तिची नजर मात्र तिच... तिच्यासारखीच आरपार भिजलेली आणि अगदी खाली झुकलेली.

"काय झाल मीरा? "   एव्हाना राघवच लक्ष तिच्या पायाकडे गेल होत आणि तुटलेल्या चप्पलचा बंद बऱ्याच गोष्टी सांगून गेला. तश्याच अवस्थेच बराच वेळ चालत राहील्याने बोटाला इजा होऊन त्यातून थोड रक्त ही येत होतं.

"मी सेशन संपल्यावर निघाले तेव्हा अचानक पावसाला सुरुवात झाली.  जवळपास टॅक्सी वगैरे काही सुद्धा न्हवते. त्यामध्येच माझी सॅन्डल तुटली त्यामुळे भिजले. पण... पण ठिक आहे मी. "    एवढा वेळ आठवून-आठवून ठेवलेल एक वाक्य तत्याचं थरथरत्या आवाजात मीरा कसबस बोलून गेली होती.

अजुनही खालीच झुकलेली तिची नजर मात्र खरं-खॊटं सार काही न बोलताच सांगत होती. तिची हनुवटी आपल्या दोन्ही हाताने वरती करत पावसा एवढ्याच थंडगार नजरेने राघवने पुन्हा एकदा प्रश्न केला.

"मीरा! सॅन्डल तुटली म्हणून भिजली?  का खुप वेळ भिजत होती म्हणून सॅन्डल तुटली? "

पण तिची ती अव्यक्त नजर त्याला सहन झाली नसावी.  त्याने लगेच आपली मान दुसरीकडे वळवली. आत्तापर्यंत बरसणाऱ्या रिमझिम पावसाने तो ही पार चिंब  झाला होता, पण पहिल्यांदाच तिच्या डोळ्यातला तो असंख्य भावनांचा केविलवाणा पाऊस पाहून आज तो पार गारठला. नेहमीप्रमाणेच अबोल असूनही आज ती नजर बरच काही सांगून गेली.

काही क्षण असेच निघून गेले असावे, शेवटी काहीही न बोलता मीराने चालण्यासाठी असफल धडपड केली, पण पायाच्या बोटाला बऱ्यापैकी लागल्याने तिला धडसे चालता येईना. गाडीचा हेड लाईट चालू असल्याने काळ्याकुट्ट अंधारातही ही गोष्ट राघवच्या लक्षात यायला वेळ लागली नाही.

"ओके.... वेट."    म्हणत त्याने तिला तशीच आपल्या दोन्ही हाताने अलगदपणे उचलून चालायला सुरुवात केली.

'आतापर्यंत फक्त स्वप्नातच ज्याच्या जवळ जाता आलं होत. तो प्रत्यक्षात आपल्या एवढ्या जवळ असणे, हे ही जणु स्वप्नवत वाटणारी ती. आणि स्वतःच्याच बायकोच्या नजरेला नजर देण्याची हिम्मत एकवटू न शकलेला तो. दोघांचीही त्या बेभान पावसात भिजलेली नजर... एक अव्यक्त जुनीच कहानी घेऊन आली होती पण पुन्हा नव्याने.'

*****

"मीरा कॉफी?"

"हो! नक्कीच."    बाल्कनीतच टाकलेल्या मॅटवर बसल्या-बसल्या मीराने कॉफीसाठी हात पुढे केला.

"पाय ठीक आहे का? हे घे."    कॉफी बरोबर दुसर्या हाताने एक बॉन्डेज तिच्या समोर ठेवत राघव ही त्या मैफिलीत सामील झाला.

"होय ठीक आहे, आणि थॅन्क्स."

"एवढ्या रात्री कॉफी म्हणजे मी आधी विचार करत होतो, तुला चालेल की नाही? पण खूपच भिजली होती म्हणून शेवटी घेऊन आलो."

"कॉफी छान करता तुम्ही. त्यामुळे नाही म्हणूच शकत नाही. आणि भिजण्याच म्हणाल तर आपल्याकडे सुद्ध्या आता श्रावण सुरु आहे मस्त पाऊस असतो. अश्या श्रावणधारा सुरु झाल्या की मग भिजल्याशिवाय राहवत नाही. त्यामुळे मला तरी सवय आहे याची."

"पण एवढं भिजत का कोणी? त्यामुळे तुझ्या बोटाला बर्यापैकी लागलं... लाव ते बॉन्डेज नाहीतर जखम चिघळेल."

"मी आधीच सांगितलं ना तुम्हाला, माझी सॅन्डल तुटली त्यामुळे भिजले, जवळपास टॅक्सी वगैरे काही सुद्धा न्हवते."

"मीरा... मीरा.... होय . समजलं."    जे समजायच ते तर राघव केव्हाच समजला होता.  दीर्घ श्वास घेत तो मिश्किल हसला स्वतःच्याच असहाय्यतेवर.

"काय झालं? का हसताय?"    मीरा त्याच्याकडेच बघत आच्छर्याने उदगारली, एकीकडे तिची पायाला बॉन्डेज लावण्याची धडपड चालू होती.

“नथिंग, दे लावतो!"    म्हणत हो ना ची प्रतीक्षाही न करता तिच्या हातून बॉन्डेज घेऊन ते लावण्यासाठी तो सरळ शेजारी बसला होता.

"थॅंक्स."    म्हणत मीराने त्या बॉन्डेज लावलेल्या बोटाकडे क्षणभर पाहिले मग मागच्या भिंतीचा आधार घेत ती ही टेकून बसली. एव्हाना कॉफी संपवून राघवही तिथेच मॅटवर सरळ-सरळ आडवा झाला होता.

चिंब भिजून बरसणारे काळेभोर आभाळ सोबतीला बर्यापैकी अंधारलेली शांत रात्र...लॉपटॉपला वाजणाऱ्या 'रिमझिम गिरे सावन' गाण्याची धून ऐकत, एकही शब्द न बोलता दोघेही एकमेकांची कंपनी एन्जॉय करत होते.

आयुष्यात काही क्षण असतातच एवढे सुंदर की, काहीही न बोलता आपल्या माणसाबरोबर अगदी शांततेत घालवलेले दोन क्षण देखील आयुष्यात कधीही न मिळालेले सुख-समाधान मिळवून देतात.

*****

दोन चेअरच्या मधोमध एक छोटस गोलाकार टेबल आणि त्यावर तिचा आवडता मिक्स फ्रुटस केक त्यावर "हॅपी मेरीज ऍनिव्हर्सरी" चा संदेश... बाजूलाच एक पिंक गुलाबाची छोटीशी कळी... अगदी तिच्या एवढीच गोड आणि स्वतःमधेच गुंतलेली. आजूबाजूला अस्ताव्यस्त पसरलेले शंभरएक कलर-कलर चे बलून्स त्या छोट्याश्या टेरेसची शोभा अजूनच वाढवत होते. हे सार टेरेसच्या दारातून पाहणारी मीरा त्या बलून्स मधून वाट काढत टेबला पर्यंत पोहोचली. तिच्यासाठी हे अनपेक्षित पण सुखदच... म्हणजे याला लक्षात आहे तर, आपल्या लग्नाचा आज पहिला बाढदिवस. एक वर्ष सरल आज.

तिने बाजूची एक कँडल उभी करून त्यावर माचिसची एक जळती काढी टेकवली. त्या मंद प्रकाशात अगदी समोरच्या भिंतीला टेकून तिच्याकडेच पाहत उभा असलेला राघव तिच्याही नजरेतून सुटला नाही.

"हॅपी मॅरिज ऍनिव्हर्सरी." म्हणत तो ही टेबलापाशी पोहोचला होता.

"हॅपी ऍनिव्हर्सरी. अँड नाईस डेकोरेशन. " तिने वरती न पाहताच विष केले.

"ऐक्च्युअली बाहेर जायच प्लानिंग करणार होतो, बट डाउट होता, तू येशील की नाही."

"हं. ते एक बर केलं." कट केलेला केकचा एक बाइट राघवच्या समोर धरत आपल्या थंडगार नजरेने मीराने त्याच्यावर एक कटाक्ष टाकला. कधी नाही एवढी खोल आणि मनाचा ठाव घेणारी ती नजर पाहून तो ही क्षणभर स्तिमित झाला होता.

"हॅपी मॅरिज ऍनिव्हर्सरी वन्स अगेन, अण्ड सो लकी ना? बीकॉज वी आर सेलिब्रेटिंग आवर फर्स्ट अण्ड लास्ट मॅरिज ॲनिव्हर्सरी टुगेदर."

तिच्या त्या शब्दांबरोबर एखादी धारदार सूरी कोणीतरी काळजात खुपसावी अशी राघवाची अवस्था होती.

"शटअप मीरा प्लिज." तो जवळ जवळ ओरडलाच.

"नो. आय एम सिरिअस आणि या सगळ्यासाठी थॅन्क्स. वन्स अगेन." म्हणत ती तिथून उठणारच होती, एवढ्यात राघवने तिला आडवले होते.

"मीरा थोडं बोलायच होत. थोडा वेळ आहे कि लगेचच झोपणार आहेस?"

"हं, उद्या मला निघायच आहे, सो लवकर झोपते. सकाळची फ्लाईट आहे ना. पुन्हा केव्हातरी."

"उद्या. एवढ्या लवकर?" राघव आच्छर्याने चक्क उठूनच उभा राहिला.

"होय. उद्या निघते मी. तिकीट बुक आहे."

"थोडे दिवस थांबू शकतेस का? किंवा कायमचंच. तसही तिथे आता कोणीही नाहीय."

अक्षरषा केविलवाणा चेहरा करत राघवने तिचा डावा हात आपल्या हातात घेतला होता. उजव्या हाताने तिच्या गालाला ओझरता स्पर्श करत तो कसेबसे चाकपडत दोनच शब्द पुटपुटला. "एक्सट्रीमली सॉरी मीरा."  इतके दिवस गोळा करून ठेवलेले शब्द-शब्द आणि वाक्य यातले काही आठ्वेना झाले.  बर्याच गोष्टी बोलायच्या होत्या. तिला अपेक्षित असलेली आणि नसलेली अशी बरीच स्पष्टीकरण द्यायची बाकी होती. पण सॉरी च्या पलीकडे तो जाऊच शकला नाही तिच्याही नकळत दोन्ही हातानी अलगद मिठीत घेत त्याने आपले ओठ तिच्या डोक्यावर टेकवले होते आणि  उभ्या उभ्या डोळ्यातून ओघळलेले काही थेंब तिच्या केसातून घरंगळत खाली उतरले.

"आय एम सॉरी राघव. खरच नाही थांबू शकत... माझी एक्झाम जवळ आली आहे आणि खरं सांगायच तर आता या गोष्टीला काहीच अर्थ नाहीय. असं समजा मी इथे आलेच न्हवते आणि तुम्ही तुमच्या पद्धतीने तुमच आयुष्य जगा आधीप्रमाणे... मी माझी माझी ठीक आहे. तसही बाबांच्या इच्छेसाठी आणि त्यांच्या आग्रहाखातर, त्यांनी पसंत केलेल्या मुलीशी लग्न करून तुम्ही आधीच तुमच्या आयुष्याच एक वर्ष वेस्ट केलंत. आता बाबाही ह्यात नाहीत त्यामुळे अजून हा दोर ताणण्यात काही अर्थ नाही."

काही ओझरत्या मिनिटाचा तो क्षण सरतो न सरतो तोच मीरा त्याच्या हातातील आपला हात सोडवत दोन पावले मागे घेत तिथून निघाली देखील. तिचे शब्द मात्र त्याला बाणासारखे छेदून गेले.

"मीरा तुला वाटत तस खरंच नाही, आणि बाबांच्या आग्रहाखातर असले तरी यात माझी सुद्धा इच्छा होतीच ना. खरच मनापासून आवडली होतीस तू मला... त्यांची देखभाल करण्यासाठी मी तुझी फसवणूक केली असं वाटतं तुला? तुला खूप काही सांगायचं देखील आहे, आणि मुख्य म्हणजे जगायच राहून गेलय, तुझ्या सोबतीने... सुरुवात करूया पुन्हा एकदा. चूक माझी आहे, मान्य आहे, पण मी कुठेतरी बांधील होतो. यापुढे खरंच मी काहीही एक्सप्लेन नाही करू शकत. ट्राय टु अण्डस्टॅण्ड मीरा प्लिज."

"मला खरच काही स्पष्टीकरण नको आहे. त्याची अपेक्षाच नाही. बाय द वे एवढी बांधीलकी कुठे आणि कुणाशी ? खूप दिवस विचारेन-विचारेन म्हणत होती. कोण आहे ती ?"

हताश होत त्याने जमेल तेवढे स्पष्टीकरण देण्याचा निष्फळ प्रयत्न ही केला. पण तेवढं आज पुरेसा न्हवत की काय म्हणून मीराने खोचक प्रश्न केला.

"तस खरंच नाहीय. कोणीही ती आपल्यामध्ये कधीच नाहीय. मी फक्त कोणाला तरी नकळत दिलेला शब्द पाळत होतो. दिला शब्द मोडणं माझ्यासाठी खरंच अशक्य होत. कारण नसताना तुला खूप काही सहन कराव लागल, मला देखील त्रास झाला, पण तेव्हा माझ्याकडे दुसरा पर्याय न्हवता. त्या वेळेस जे योग्य वाटलं ते ते मी करत गेलो आणि तीच माझी सर्वात मोठी चुक ठरली."

"जे झालं ते झालं. आता गोष्टी वेगळ्या आहेत आणि मला माझं एक वेगळं जग सुद्ध्या आहे. तुम्ही दिलेल्या शब्दाला जागत राहिलात यात मी मात्र कायम दुय्यम स्थानी राहिले. म्हणून या वेळी मी मला आणि माझ्या भावनांना प्राधान्य द्यायच ठरवलंय. ज्याची कधी सुरुवात झालीच नाही ते नातं यापुढे असच आशेच्या झुल्यावर झुलवत ठेवण्यापेक्षा सार काही इथेच थांबवूया. आय होप, यु रिस्पेक्ट माय फीलिंग्स."

विषयाला कायमचा पूर्णविराम देत मीरा तिथून तडक हॉलच्या दिशेने निघाली. बोलण्यासारखं काहीही उरलं नाही. हताश आणि निराश आपल्याच एकटेपणाला गोंजारत राघवही उभ्या जागी खाली बसला. अगदी होपलेस आणि हैल्पलेस.

*****

तिचे-त्याचे हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच एकमेकांत अडकलेले काही आनंदाचे क्षण होते. लग्नापूर्वीचे आणि लग्न होईपर्यंतच. त्यानंतर मात्र त्या नात्याला न सांगताच जणू वाळीत टाकलं गेलं. फक्त नावापुरतं. आज खरच त्याचाही शेवट झाला होता? तेच ते... अव्यक्त आणि अबोल असलेलं गुपित, ज्याची भनक देखील मीराला केव्हाच लागली नाही. सर्वस्वी सगळा दोष राघव वरती टाकून तिने आपला मार्ग मोकळा केला होता का ?

*****

अगदी धावपळीत ऑटोने राघवने एअरपोर्ट गाठले पण फ्लाईट केव्हाची निघून गेली होती. आणि मिराही? 'तिला सांगितलं होत, मी बँकेचं काम उरकून येईपर्यंत थांब. पण शेवटी नाही ऐकलं.' मनाला चुटपुट लागली होती.

तसाच हताश होऊन तो फुटपाथवर एका बाकड्याचा आधार घेत त्यावर बसला. आपल्याकडे कोणीतरी बघतंय याची जाणीव होऊन त्याने नजर टाकली. बॅग एका बाजूला कलंडलेली, पर्स एक दुसऱ्या हातावरून ओघळत होती. त्यातून काही पेपर्स बाहेर पाण्यात पडून ओले झाले होते. या अवस्थेत त्याची मीरा त्याच बाकड्याच्या दुसऱ्या टोकाला त्याच्याकडेच नजर लावून बसली होती.

बाकड्यावरून थोडं सरकत तोही तिच्या जवळ जाऊन बसला. "फ्लाईट चुकली की चुकवली?"

"चुकली. ते बाबांनी तुम्हाला दिलेलं लेटर...ते माझ्याकडेच राहील होत. कदाचित त्या पेपर्सच्या बंचमधून आलं असावं. तुम्ही येतोय म्हणालात म्हणून इथेच वाट बघत थांबले. ते लेटर देण्यासाठी. आणि फ्लॅइट निघून गेली."

"ओके. कुठे आहे लेटर?"  तोही तिची खिल्ली उडवत सहजच इकडे तिकडे शोधू लागला.

"ते...भिजलं. ते मी माझ्या हातातच घेऊन उभी होती. मग... पाऊस..."   समोर पाण्यात भिजून पार गोळा होऊन पडलेल्या कागदाकडे बोट दाखवत मीराने खाली मन घातली.


"ओके आणि याच काय? याला पण तुझ्यासारखं पावसात भिजायला आवडत का?"  समोर उघड्या पडलेल्या तिच्या पर्स मधून तेच ते रात्री दिलेलं गुलाब बाहेर डोकावत होत.

क्षणाचाही विचार न कारता मीराने अक्षरशा ते पर्समध्ये कोंबलं, आणि त्याच क्षणी "सॉरी" म्हणत राघवने तिला जवळ घेतल होत.

"मीरा गेले काही दिवस मी इथल्या सगळ्या फॉर्मेलिटीज कम्प्लिट करत होतो. तुझ्याबरोबर येण्यासाठी... तो फ्लॅट, गाडी वगैरे सगळ्याच कंपनीच कॉंट्रॅक्ट असत. काही गोष्टी मार्गी लावल्या, तर काही अजूनही बाकी आहेत. ते सगळं एकदा संपवतो मग जाऊया?"

होकारार्थी मान हलवत मीराने आपले डोळे पुसले. आपण ते लेटर वाचलं, हे मीराने केव्हाही राघवला सांगितलं नाही. आणि राघवने बाबांना दिलेलं वचन ही अबाधित राहील. 'एकटेपणाला कंटाळलेल्या बाबांनी स्वतःच्या स्वार्थासाठी म्हणा किंवा सेवेसाठी म्हणा, हक्काचं माणूस असावं म्हणून मीराला राघव पासून दूर केलं होत. 'लग्नानंतर  मीराला इथेच ठेवायचं'असं त्यांनी वचन घेतलं, आणि नकळत 'हो' म्हणून गेलेला राघव या वचनात अडकला गेला. याचा कबुली जबाब असलेलं ते लेटर चिंब भिजत पाण्यात विलीन झालं होत.'

'तुरळक रिमझिम पावसाला पुन्हा एकदा सुरुवात झाली होती. त्याच पावसात मीरा आणि तिचा राघव दोघेही हातात हात घालून घरच्या रस्त्याला लागले. त्यांच्या विरहाची फ्लाईट केव्हाच निघून गेली होती.'



# एक पाऊस मनातला

एक पाऊस मनातला,
इंद्रधनुष्याची चाहूल आणिक रिमझिम बरसत,
तुझ्या  माझ्या आठवणी जागवणारा!!!

एक पाऊस मनातला,
सुसाट वारा आणिक मुसळधार कोसळत,
तुझ्या माझ्या विरहात धीर देणारा !!!

एक पाऊस मनातला,
मातीच सुगंध आणिक  चिंब भिजवत
तुझ्या माझ्या प्रेमाची साक्ष असणारा!!!

एक पाऊस मनातला
काळ्याभोर ढगात येऊन थांबलेला
तुझ्या माझ्या ओढीची आतुरता समजणारा!!!

एक पाऊस मनातला
पानांना पोपटीगार ते हिरवागार करत
तुझ्या माझ्या प्रेमाला गडद करण्याचे संकेत देणारा!!!!

एक पाऊस मनातला.

*****

अर्चना गवस / चौधरी
पुणे

# कपाशीचा पाऊस

'काळ्या मेघाराजाने आभाळात दाटी-वाटी केली होती. वारा भिरभिर घिरट्या घालत होता. फक्त एका थेंबाच्या प्रतिक्षेत कुठेतरी एखादा चुकार चातकपक्षी आवासून आशेने नभाळाकडे टक लावून होता. शेवरीच्या झाडाची बोंड आता चांगली तयार झाली. त्यातून निघणार्या सफेद म्हातार्या गोल-गोल भिंगर्या घालत स्वच्छंद विहार करत होत्या. लहानपणी आम्ही त्यांनाच कपाशी समजायचो, आणि ही कपाशी म्हणजे कापसासारखी दिसणारी म्हातारी जेव्हा वार्याबरोबर उडायची, तेव्हा जो पहीला पाऊस यायचा त्याला म्हणायचो, 'कपाशीचा पाऊस'.

'कपाशीचा पाऊस.' विज चमकावी तसं काहीस मला झालं. नको तो कपाशीचा पाऊस. नकोच त्या आठवणी. कधी काळी चिंब कोसळलेल्या त्या पावसाने पार भिजवून टाकल या मनाला, एवढं की आता भिती वाटते याची. '

‘पाऊस यायच्या आधी शाळा गाठावी.’ मी लगबगीने आपली पर्स सावरत पाय उचलला.

"सुप्रभात बाई!"

सुप्रभात मुलांनो! म्हणत मी रजिस्टर हातात घेणार, एवढ्यात शिपाईकाका वर्गात येऊन टपकले.

"बाई तुम्हाला स्टाफरुममध्ये बोलावलं आहे. कालचे ते गणेश मानेचे पालक, तुम्हाला भेटायचं म्हणत आहेत."

"दामूकाका, गणेशचे पालक तर कालच त्याच्या मास्तरांना भेटून गेले ना! आता परत काय आहे?" मी आश्चर्याने प्रश्न केला.

"बाई जरा येऊन बघता का. तुम्हालाच भेटायचं आहे असं म्हणतात ते." म्हणत शिपाईकाका निघून गेले. आणि मी सुद्ध्या त्यांच्यामागून माझ्या केबिनकडे निघाले. गणेशच्या आई आणि तो स्वत: दोघेही आधीच तिथे येऊन माझी वाट पाहत होते.

"हा बोला! काय म्हणताय काकू." मी प्रश्न केला.

त्याच्या आई अगदी शांत होत्या, कधी बाजूच्या भिंतीकडे, तर कधी समोरील टेबलाकडे टकमक बघत त्यानी गणेशकडे पाहीले. पण एक शब्द ही त्यांच्या तोंडातून बाहेर पडेना.

"काकू जे असेल ते बिनधास्त बोला. तिकडे माझा वर्ग चालु आहे. मला लवकर जाव लागेल." मी पाण्याचा ग्लास त्यांच्यापुढे करत त्यांना बोलत करण्याचा प्रयत्न केला. दोन... पाच मिनिट अशीच शांतता पसरली. मग मात्र मी गणेशला बाहेर थांबायला सांगून त्या काकुंशी बोलले .

विषय नाजूक होता.

'दुसर्या वर्गातल्या एका मुलीशी गणेशचे प्रेम सूत जुळले आहे, अशी चर्चा शाळेत चालू होती, त्या मुलीच्या पालकांनी मुख्याध्यापकांजवळ गणेश विरुद्ध तक्रार ही केली होती. त्यावेळी फार आरडाओरड आणि गोंधळ झाला होता. शाळेत या चर्चेस उधाण आले होते. प्रकरण जरा जास्तच चिघळले. या अशा प्रकारामुळे शाळेला नावं पडायला नको, म्हणून मुख्याध्यापकांनी सहमताने तडक गणेशचे नाव शाळेतून काढून टाकण्याच निर्णय घेतला होता.'

यामध्ये तालुक्यात ही एकच शाळा. आपल्या मुलाचे शालेय नुकसान होऊ नये, ही त्या मातेची कळकळ होती.

मी गणेशला आतमध्ये बोलावल. खरेखोटे मला त्याच्या तोंडून ऐकायचे होते. १४-१५ वर्षाचे ते पोर, पण तो जे काही बोलला, ते ऐकून मला एक झटका लागला. 'म्हणे... खरच आवडते मला ती, तिच्यासाठी खुप कष्ट घेईन, मोठा ऑफिसर बनेन, पण आता मी अभ्यासात लक्ष देईन, कोणालाच त्रास वैगरे होईल अस यापुढे वागणार नाही.' त्याने प्रामाणिकपणे सारं काही कबूल केल. अगदी कोणतीही गोष्ट न लपवता. मी देखिल त्याला समजावलं. ' अद्याप तरी तू खुप लहान आहेस. पण समजुद्दार आहेस. सध्या या सगळ्या गोष्टींपेक्षा अभ्यास महत्वाचा आहे. शिकून खुप मोठा हो. बाकी सगळ्या गोष्टी त्या त्या वयामध्ये आपोआप होत जातात. मी मुख्याध्यापकांनी बोलेन पण लक्षात ठेव यापुढे यासंदर्भात तुझी एकही तक्रार येता कामा नये. '

गणेश आणि त्याची आई निघून गेले. मी तडक आबांच्या कॅबिनमध्ये जाऊन त्यांना गणेशला एक संधी देण्यासंदर्भात विनंती केली. एका मुलाच्या शिक्षणाचा प्रश्न होता. शिक्षण नाही तर त्याला आयुष्यात पुढे जाण्याची संधी मिळणार नाही. जिल्ह्याच्या शाळेत घालून त्याला शिकवण्याएवढी त्या माऊलीची परिस्तिथी नव्हती. मी प्राध्यापक म्हणजेच आबांशी, त्या मुलाच्या भवितव्यासाठी एक संधी मागितली, पण आबांनी साफ नकार देऊन या विषयी काहीही न बोलणे पसंत केले. मी खजिल मनाने माझ्या वर्गाकडे जायला निघाले आणि तेवढ्यात कोणीतरी मला हाक मारली. आवाजाच्या दिशेने सहज लक्ष टाकले तर तिथे गौरी उभी होती. माझी एक हुशार विध्यार्थीनी.

"गौरी तू .... काय गं? वर्गात गेली नाहीस का?"

"नाही बाई, मी जिल्ह्याच्या शाळेत शिकायला जाते. आजच दाखला देऊन आले. खर तर तुमचे आभार मानायचे होते, म्हणूनच इथे आले."

"आभार कसले गं?" मी अती आश्चर्याने प्रश्न केला.

"बाई गणेशला एक संधी दिल्याबद्दल आभार! तो भेटला होता मला. माझ्यामुळे त्याच नुकसान होऊ नये, म्हणून मी स्वतःच बाहेरच्या शाळेत शिकायला जाते. त्याला इथे शिकूदेत.

आजूबाजूचा कानोसा घेत तिने सगळे स्पष्ट केले होते. आता कुठे माझ्या लक्षात यायला लागले.

"बाई आम्ही चुकीच काही केल नव्हत हो! कधीतरी येताजाता भेटायचो, पण शाळेतल्या मुलांनी एकाच दोन करुन काय मनाला वाट्टेल ते सगळीकडे पसरावलंय. जेव्हा मिट्टीन्ग झाली, तेव्हा मला कोणीही काही बोलण्याची संधी दिली नाही. पण आता जेव्हा गणेशला एकट्यालाच दोशी ठरवून, शाळेतून काढणार समजले, तेव्हा मी सारे काही घरी सांगून टाकले, आणि स्वतःच शाळाही बदलण्याचा निर्णय घेतला. यापुढे कोणाला त्रास होईल अस अजिबात वागणार नाही." बोलता बोलता तिचा कंठ दाटून आला. परत एकदा आभार मानून ती जड पावलांनी निघूनही गेली.

खरतर आबांनी गणेशला शाळेत ठेवण्याची परवानगी तर दिली नाहीच. मला माझीच लाज वाटली, आणि तिच कौतुक. कारण आज तिच्यामध्ये असलेला प्रामाणकपणा काही वर्षांपूर्वी मी दाखवला असता तर? तर असाच कोणतरी गणेश एकटाच दोशी ठरला नसता. आणि त्याच शिक्षण क्षणात उधळलं नसत. पण तेव्हा ते साहस माझ्यामध्ये नव्हते. मी एका लाचारासारखे परिस्थिती पुढे हात टेकले होते. पण नाही... आता नाही. आज परत आबांना मी जिंकू देणार नाही.

मी तडक निघाले ते मॅनेजमेंट कमिटीकडे. पण नेहमी प्रमाणेच आबा समोरच उभे होते. मी काही बोलण्याच्या आधीच त्यांनी मान डोलावली.

"मनू! गणेशला उद्या वेळेवर यायला सांग. आणि हो! या वर्षी देखिल तो वर्गात पहिला आला पाहिजे, ती जबाबदारी तुझी." एवढं बोलून ते निघूनही गेले.

कदाचित माझं आणि गौरीच जे बोलन झालं, ते त्यांनी ऐकल असाव. कदाचित परत एकदा त्यांना या गौरीची माझ्यासारखी मनू करायची नव्हती.

कदाचित तेव्हा अशीच एक संधी जर त्याला मिळाली असती तर? तो... तो...

'विसर मनू.... एवढी वर्ष झाली, पण तो अजूनही मनात तसाच आहे. स्वतःला जगापासून बंधीस्त करुन ठेवल मी, कोणाला आयुष्यात सामील करुन घेतल नाही. पण त्याला नाही विसरले, विसरता आलच नाही.

कुठे असेल तो? काय करत असेल? मी... मी... आठवत असेन का त्याला? कदाचित तो त्याच्या संसारात ही रमला असेल.'

मी माझ्याच विचारांत वाहत चालले होते. जुन्या कटू आठवणी उगाळत मुक अश्रू ढाळीत होते. अचानक जोराने विज कडाडली आणि क्षणात साऱ्या विचारांची आहुती देऊन ती निघूनही गेली. मला नको असणारा कपाशीचा पाऊस परत एकदा सुरु झाला होता, माझ्या मनात... आत... खोलवर... आणि बाहेर ही...

*****

"मनू, ते नवीन चेअरमन भेटायला येणार आहेत. खरतर मीच आग्रह करून बोलावलं आहे त्यांना. तू ही येते का बाहेर? तेवढीच भेट होईल."   आबांनी अंगणातूनच ओरडून मला हाक दिली होती.

नवीन चेअरमन ते कशासाठी? मला काही समजेना.

"आबा, कोण नवीन चेअरमन? मला काहीच समजले नाही."    मी कपडे चेंज करून, ओले कपडे तिथेच एका दांडीवर वाळत टाकत तडक अंगणामध्ये आले.

"अगं, शाळेची जमीन एका जमीनदाराची होती. त्यांना पैश्याची अडचण होती म्हणून ती जागा त्यांनी विकली. मग शाळेच काय करायचं ? हा प्रश्न उभा राहीला.  बंदच करायची वेळ आली होती पण योगायोग बघ... एका सद्गृहस्थाने तीच जागा विकत घेतली, आणि परत शाळेच्या नावे सुपूर्द केली. माझ्या आग्रहावरून ते भेटायला येत आहेत  इथे."  नेहमीप्रमाणे समोर पेपरमध्ये डोकं घालून आबा सकाळच्या बातम्या संध्याकाळी वाचत होते.

"आबा एवढी मोठी गोष्ट तुम्ही याआधी मला केव्हाच सांगितली नाही. "

"शाळेच्या काही गोष्टी खाजगीत ठेवाव्या लागतात. त्यात वयोमानानुसार मी ही आजकाल खूप काही विसरत चाललोय ग. तुझे आबा म्हातारे झाले आता. "  म्हणत आबा त्यांच्या जाडजूड चष्म्याच्या काड्या वरती करत हसले.

एवढ्यात ते नवीन चेअरमन येऊन बसले, तिथे अंगणातच असलेल्या  झोपाळ्यावर त्यांच्या आणि आबांच्या गप्पा-ठप्पा रंगल्या देखील. त्याआधीच मी "बरं बरं. चहा घेऊन येते." म्हणत आतमध्ये स्वयंपाकघराकडे वळले होते.

"मनू! चहा?"

आबांच्या आवाजासरशी मी चहाचा ट्रे घेऊन अंगणात आले. चहा ठेवून बसणारच एवढ्यात आबांनी आमची ओळख करून दिली.

"हे 'मिस्टर तांबे' नवीन चेअरमन, आणि ही माझी मुलगी मनस्विनी. त्याच शाळेत शिक्षिका आहे."

'मी नमस्कार म्हणण्यासाठी हात जोडून वरती पाहिले, पण मला काही म्हणण्याची हिम्मत झालीच नाही. नुसतेच हात जोडून मी मिनिटभर आवासून बघतच राहिले.  हे  'मिस्टर तांबे'? एक जुनी ओळख होती. त्याची, एका पावसाची आणि माझी... पुढचे काही आठवण्याची हिम्मत माझ्यामध्ये आत्ता उरलीच नाही.  मान खाली घालून मी नुसती बसून राहिले. कारण त्याच्याही नजरेत ओळखीची झलक होती. जुनी ओळख. वर्षानुवर्षांची...'

“मला उशीर होतोय आणि आभाळ भरून आलंय त्यामुळे पाऊस येण्याचे चिन्ह ही दिसत आहे. निघतो मी. पुन्हा केव्हातरी भेटू. " म्हणत ते उठलेही. एवढ्यात आत माजघरात असलेल्या जुन्या टेलिफोनची रिंग वाजली.

"एक महत्वाचा फोन येणार होता. तोच असेल बहुदा. मलाच जाऊन पाहावं लागेल." म्हणत आबा ही त्यांचा निरोप घेऊन आत वळले.

जाताना, "मनू पाहुण्यांना गेटपर्यंत सोडून ये." अशी आज्ञा करून गेले.

मी एकही शब्द न बोलता बाजूची एक छत्री घेऊन त्यांच्यासोबत गेटपर्यंत आले. गेटजवळ एक जुनी जिप्सी कार उभी होती. येतो म्हणत ते दरवाजा उघडणारच तेवढ्यात अचानक पावसाला सुरुवात झाली होती.

"पाऊस आहे, जा तुम्ही. मी निघतो." म्हणत त्यांनी माझ्याकडे पाहिलं.

"होय. पहिला पाऊस आहे." उगाचच काहीतरी बोलायचं म्हणून मी बोलून गेले.

"पहिला नाही. कपाशीचा पाऊस...बरोबर ना?" म्हणत त्यांनी परत माझ्याकडे पाहिलं आणि मी अगदी निःशब्ध झाले.

"राजन." एवढा एकच शब्द माझ्या तोंडून निघाला. छत्री सावरत मी मागे वळणार तोच जोराची वीज चमकली, बेभान वार्याने माझी छत्री उलटी केली होती. तिला सावरण्याची कसरत करत मी जागीच खिळले.

"अजून विजेला घाबरतेस?" म्हणत त्याने माझ्या हाताची छत्री स्वतःचा हातात घेत तिला सरळ केले. परत बंद करून माझ्या हातात देत पुढे म्हणाला,

"आज परत एकदा भिजवास वाटतंय, अगदी त्या दिवशी सारखं, ना विजेची भीती... ना वार्याचे भय, उनाड लहान मुलाच मन घेऊन, सैरभैर धावत सुटावं... रानोमाळी. ते ही तुझ्यासोबतीने."

"का आलास परत?" मी रागारागाने प्रश्न केला.

"यावंच लागलं. माहित होत मला, कोणीतरी वाट पहाताय माझी, आणि नाही नाही म्हंटल तरी त्या कपाशीच्या पावसाचीही. "

त्याच्या उत्तराने माझा राग कुठल्या कुठे पळाला होता. त्याचा हात हातात घेत मी भरल्या आभाळाकडे पाहिले.

'खरच भिजायचं. अगदी त्या दिवशी सारखं, लहान मुलं होऊन."

त्यानेही मानेने होकार भरला. आणि तसेच आम्ही निघालो... त्या कपाशीच्या पावसाचा आनंद घेत. ना विजेची भीती... ना वार्याचे भय.

दोन पावलं चालताच तो मध्येच थांबला. मी मानेने काय झालं म्हणून विचारताच म्हणाला,

"मनू. आज परत तेव्हासारखं कुणी पाहिलं तर? काय म्हणतील लोक? "

मी ही दोन मिनिट स्तब्ध झाले, मग हसून त्याला म्हणाले, "आता तुला कोणीही शाळेतून हाकलून देऊ शकत नाही. कारण आता शाळाच मुळी तुझी आहे. आणि...आणि..."

"होय. तेव्हा शाळेतून काढलं नसत तर, तो राजू आता मिस्टर राजन तांबे झाला नसता. तुझ्या आबांचे आभारच मानायला पाहिजेत." म्हणत तो ही हसला.

"होय. पण आबांनी तुला ओळखलं कस नाही?'' मी माझ्या मनातलं आश्चर्य व्यक्त केलं.

तो अजूनच मोठ्याने हसून म्हणाला, "ओळखल्याशिवाय तो महत्वाचा फोन घ्यायला ते गेले का? त्यांनी केव्हाच ओळखलं मला. तस तू येण्याआधी बोलूनही दाखवलं. त्यावेळेसही ते माझ्यासाठी उभे होते. पण शाळेच्या नियमांपुढे कुणाचे काही चालले नाही."

"म्हणजे आबांनी मला त्यासाठी तुला गेटपर्यंत सोडायला सांगितलं तर? " माझा अजूनही विश्वास बसत नव्हता.

"होय. चल... पुन्हा एकदा शाळेत जाऊ."

आम्ही दोघेही शाळेच्या दिशेने निघालो. आज कपाशीच्या पावसाची मला भीती नाही, किवा कोणीतरी पाहिलं त्याची लाज ही नाही. आज कोणी विचारलं तर, अगदी गौरीने जेवढ्या निर्भीडपणे गणेशाची साथ दिली, तेवढ्याच हिमतीने ओरडून-ओरडून सांगेन त्यांना,

'होय। आवडतो मला तो, आणि त्यालाही मी आवडते, आणि आम्हाला दोघांना आवडतो हा बरसणारा कपाशीचा पाऊस.'



# तो पावसाळा

गडगडणाऱ्या ढगांकडे बघत ,
तो पावसाळा आठवला मला परत,

तु जवळ घेणं आणी मी कुशीत लपण,
पावसाच्या थेंबाच गालावरून हळूच ओघळण,

घायाळ  मधहोश करणारी ती तुझी नजर,
म्हणूनच पावसाच्या सरी सारखा फुटला प्रेमाचा पाझर,

आठवतं तुझ्या मिठीच्या हर एक गोष्टी,
पावसातल्या त्या आवडलेल्या आणी अनुभवल्या नवनवीन सृष्टी,

पावसाचा दरवळ तुझी आठवण देतो,
तू जवळच आहे असे सारखे भासवतो,

प्रत्येक हिरवगार झालेलं रान आता तुला शोधत आहे,
मृगजळा सारखे तू जवळचं आहे असे भासवतो आहे,

तुझ्या सोबत आज परत एकदा पाऊस झेलायचे आहे,
चातका सारख्या माझ्या मनाला तुझ्या प्रेमात भिजवाचे आहे

येशील का पावसासारखा एकदा परत ,
तुझ्याविणा माझे मन राहते झुरत

*****

अरुणा धनंजय विचारे
पुणे

# जाई!

*श्रावणात घन निळा बरसला*
*रिमझिम रेशिमधारा !*
*उलगडला झाडांतुन अवचित*
*हिरवा मोरपिसारा !*

'पाडगावकरांचे गीत, ते ही लता दिदींच्या आवाजात ऐकण्याचा आनंदच वेगळा ना? वर्षा झालं का तुझं? निघायच का?" घनश्यामने रेडीओचा आवाज कमी करत हाक दिली. बाहेर मुसळधार पाऊस फेर धरुन तांडव करत होता.'

'आज काय झालय काय याला? वर्षभराच एकदाच पडून घेतोय वाटत.' त्याच्या मनात विचार आला.

"वर्षा झालं का गं? " त्याने परत आतल्या दिशेने पाहत विचारले. पण काहीच उत्तर मिळाले नाही.

'हिचा आपला नेहमीचा उशीर. एवढ्या दिवसांनंतर ही काही बदल झालेला नाही. आहे तशीच आहे.' म्हणत घना किचनकडे वळणार तेवढ्यात टेलिफोनची रिंग वाजली.

"हॅलो!"

"घना तात्या बोलतोय." पलिकडून चाचपडत्या आवाज.

"हा, तात्या बोला ना! कसे आहात?"

"मी ठिक रे, ते हॉस्पीटलमध्ये वर्षा...." तात्या मधेच अडखळले.

"हो काका, आम्ही तिथेच निघालोय चेकपसाठी. एक एकच मिनिट हा... " म्हणत त्याने रिसिव्हर बाजुला करुन पुन्हा एकदा वर्षा असा आवाज दिला.

"तुला केव्हा समजलं? फार वाईट झाल रे! वर्षा..." तात्या फोनवरती रडायला लागले. त्यांचा रडण्याचा आवाज घनाला अगदी स्पष्ट ऐकू येत होता.

"काका झालं तरी काय? बोला ना! वर्षाला फोन देऊ का?"

"वर्षाला फोन कसा देणार? ती गेली ना रे. आपल्याला सोडून गेली रे ती... कायमचीच!" काका पुन्हा हमसून हमसून रडू लागले होते. ते काय बोलत आहेत ते ऐकून घनाचे तर आवसानच गळून पडले.

"वेड्यासारख काय बोलताय काका... कस काय शक्य आहे? ती... ती तर काल रात्रीच इथे आली... आम्ही आत्ता हॉस्पिटलमध्ये निघालो आहोत."

"घना...  तू ठीक आहेस ना? तुला शॉक लागला असेल ऐकून, लागणार म्हणा, एकत्र राहत नसलात तरीही शेवटी तुझी बायको होती ती ... पण हेच खर आहे. वर्षा आता आपल्यामध्ये नाही आहे."

काकाचे शेवटचे वाक्य, आणि घनाला दरदरुन घाम फुटला होता. हातातले रिसिव्हर गळून पडले. दुसर्याच क्षणी त्याने किचनकडे धाव घेतली.

'वर्षा!'

'वर्षा!'

खुप वेळा आवाज दिला, सैरभेर शोधल त्याने, पण वर्षा घरी कुठे दिसेना. गोठून टाकणारा गारवा हवेत पसरला होता, बाहेर घनघोर पाऊस आणि याच्या मस्तकावरुन मात्र घामाचे ओघळ लागले होते.

'काल रात्रीच तर आली ती. मध्यरात्री... त्या बाहेरच्या जुईच्या झुडपाखाली उभी होती माझी वाट पाहत. केवढी भिजली होती. मला पण घरी यायला उशीर झाला होता. आल्या-आल्या माझ्या मिठीत शिरून खुप-खुप रडली वेडी. किती गप्पा मारल्या आम्ही... मग एकदास ठरवुन टाकलं, यापुढे भांडायचे नाही. मी अगदी शुल्लक गोष्टीवरुन भांडत बसायचो, एकदा ती रागावून माहेरी निघून गेली ती ६-७ महिने आलीच नाही, आणि मी पण हट्टी... तिला आणायला ही गेलो नाही. ना फोन... ना भेट. पण काल आली ती. हो कालच आली... लवकरच मी बाबा होणार आहे हे सांगायला. मला पक्क आठवतंय. मी काय वेडा नाही.  तिचे काका काहीही बोलतात. बेडरुममध्ये असेल.... असेलच....'

त्या बाहेरच्या पावसासारखाच बेभान झालेला घना बेडरुमकडे वळला.

'कपाटाच्या इथे? नाही... नाही... तिला तयार व्हायला वेळ लागतो ना, आरश्याच्या इथे असेल... नाही, मग बाथरुममध्ये?' अख्खे घर शोधून झाले, तेव्हा हताश घना डोक हाताने गच्च धरुन पलंगावर बसला. काय चालल आहे हे त्याच त्यालाच कळेना. आसमंत बडबडला, तडफडला, खुप रडला. अगदी बरसणार्या पावसासारखा. बाजूला असेलेल्या टेलीफोनची रिंग वाजून-वाजून थकली, एक... दोन, तीन वेळा... कितीतरी वेळ फोन वाजतच राहीला होता.

एका घटीकेचा अवधी हा हा म्हणता सरला होता. कडाडून विजेने आपण आल्याची वर्दी दिली. ढगांचा नाद सुरु झाला आणि पुन्हा पावसाने जोर धरला. वादळवाऱ्याने एकाकी बंद खिडकी खडखडून उघडली होती. त्या आवाजाने शुद्धीवर येऊन घना पलंगावरून उठला. बाजूचा फोन उत्तराच्या अपेक्षेने अजून ही अधूनमधून वाजतच होता. घनाने तो सुन्नपणे कानाला लावला.

"घना तू ठिक आहेस ना? आम्ही वाट पहातोय रे हॉस्पिटलमध्ये. येतोयस ना?"   तात्या मलुल आवाजात बोलत होते.

"सारच संपलं. आता काय बाकी आहे काका. माझ्यासाठी  संपलं सगळ."

"अरे अस म्हणू नकोस. त्या लहान जिवासाठी तरी. तुझी वर्षा एक छोटी कळी मागे सोडून गेली आहे. इथून कायमचेच निघून जाण्याआधी तिने काल एका गोंडस मुलीला जन्म दिला आणि मध्यरात्री अचानक जिव सोडला."

"म्हणजे काका... मला मुलगी झाली..."    पुढे घनाच्या तोंडातून एकही शब्द फुटेना.

आता त्याला एकत्रीतपणे मिळालेला आनंद आणि त्याबरोबरच आलेले दुखः या दोन्ही गोष्टी पचविणे जड झाले होते. अवाक होऊन तो पुन्हा जागच्या जागीच कोसळला. बाजूच्या धडधडणार्या खिडकीतून अचानक आतमध्ये सपकन थोड्या जनधारांचा मारा झाला होता.  त्यासरशी बाहेरुन आत डोकावू पहाणार्या जाईच्या वेलीची ओंजळभर ताजी टवटवीत फुले त्या लालसोनेरी चादरीच्या घडीवर येऊन विखुरली होती.  तिचं चादर, जी सभोवती लपेटून वर्षा त्याच्या कुशीत शांत झोपली होती. कदाचित कायमचीच... काल रात्री... स्वप्नात की सत्यात?

पलिकडून तात्या फोनवरती बडबडत होते.  "तुला माहिती आहे.  वर्षाने तर बाळाच नाव सुद्ध्या ठरवून ठेवल होत रे. मुलगा झाला तर विहंग... आणि मुलगी झाली तर जाई. तुझी जाई तुझी वाट बघतेय. येतोस ना?."

त्या जाईच्या फुलांसकट ती चादर उराशी लावून घना खिन्न मनाने उठला. तसेच रडविले नेत्र पुसत घाईघाईने निघालाही, त्याच्या जाईला भेटायला. सकाळपासून सुरु असलेली पावसाची रिपरिप ही थांबली होती.  कधीही न थांबण्यासाठी एक चिरंतन पाऊस आता घानाच्या आत बरसू लागला. आत... मनात... खोलवर.

त्याच्या आणि वर्षाच्या विरहाचा पाऊस.



# मला पाऊस खूप आवडतो

कालच तू विचारलं, मला पाऊस का आवडतो ,
मला पाऊस आवडतो कारण मला रंग आवडतात,
तो झाडाचा पाऊस पडायच्या... आधीचा हिरवा रंग ,
नंतरच तो हिरवागार आणि तो पोपटी रंग पाऊस ओसल्यानंतर,
एकाच रंगाच्या इतक्या छटा फक्त पावसातच दिसतात,
म्हणूनच मला पाऊस खूप आवडतो!!

कालच तु विचारलं, मला पाऊस का आवडतो,
मला पाऊस आवडतो कारण मला आवडतात आठवणी,
कधी येतो तो धो धो, तर कधी हळुवार थेंबांची बरसात
कधी इंद्रधनुष्याची कमाल तर कधी काळीकुट्ट अंधाराची साथ
अश्या आठवणी पण असतात ना मनात म्हणूनच मला पाऊस खूप आवडतो!!

कालच तू विचारलं, मला पाऊस का आवडतो
मला पाऊस आवडतो कारण मला प्रेम करायला आवडत,
पाऊस तर प्रेम करतो... अगदी निस्वार्थी प्रेम,
स्वताला: झोकून देऊन वाहत जात,
स्वत: आनंद होत,दुसर्याला आनंदी करायचं,
म्हणूनच मला पाऊसही आवडतो !!

*****

अर्चना गवस / चौधरी
पुणे

# थोडं तुझं थोडं माझं

क्लिक... क्लिक... क्लिक...

"वाह! ब्युटीफुल."

एका निळसर झाक असलेल्या धोतर्याच्या फुलावर बसलेले, लाल ठिपकेदार फुलपाखरू पिनीने अलगद टिपले होते. आपला डी एस एल आर कॅमेरा गळ्यात अडकवत तिने एक समाधानाचा सुस्कारा सोडला तेव्हा कुठे तिच्या लक्षात आलं, कि आपला फोन केव्हापासून वाजतो आहे. स्क्रीनकडे पाहून एक हलकीशी स्माईल देत तिने फोन उचलला.

"गुडssss मॉर्निंग. एक परफेक्ट शॉट आणि एका परफेक्ट माणसाचा फोन. क्या बात है? सकाळी-सकाळी कॉल."

"काय करणार. त्या परफेक्ट शॉटच्या नादात मला विसरत चालली ना तू? " कॉफी मग टेबलवर ठेवत विराजने लॅपटॉप बंद केला.

"एक्सट्रीमली सॉरी... खरच मी रात्री खूप वेळ ट्राय करत होते, बट इकडे नेटवर्क प्रॉब्लेम आहे. आणि सकाळी शूटसाठी निघाव लागलं. सो राहून गेलं."

"ओके हनी. नो प्रोब्स. बाय द वे, रिटर्न केव्हा येतेस?"

"रात्रीची फ्लाईट आहे. सो अर्ली मॉर्निंग भेटूया. प्रॉमिस."

"याह. डन... मिस यु हनी. एक क्लाईंट कॉल वेटिंगवर आहे नंतर बोलूयात प्लिज."

"ओके. मिस यु टू. बाsss बाय." म्हणत पिनीने फोन कट केला. तिचा डोक्यात विचारचक्र फिरू लागली.

'आपण कालपासून विराजला एकही फोन केला नाही. खरच माझ्या परफेक्ट शॉट च्या नादात विसरते की काय मी त्याला? आणि हो ! उद्या भेटल्यावर काय सांगू? त्याने दोनच ऑपशन्स माझ्यापुढे ठेवलेत. 'एकतर एखाद्या वर्षाचा करिअर ब्रेक किंवा लग्न पोस्पॉन्ड करायचं. हे कॉम्प्रोमाइज फक्त मलाच करावं लागणार. का? तर, तो एका जागेवर सेटल आहे, आणि मी माझ्या फोटोग्राफीसाठी इकडे तिकडे फिरत असते. म्हणजे झालं तर, याचा अर्थ असा आहे की, थोडक्यात मी त्याला म्हणजेच आमच्या रिलेशनशिपला वेळ देऊ शकत नाही.

रेवा म्हणाली ते एका अर्थी बरोबर होत. 'मी सुध्या एक नामांकित फोटोग्राफ र आहे. माझं सुद्धा करिअर आहे. याकडे विराज जाणून बुजून दुर्लक्ष करतोय.'

दोन महिन्यांनी आमचं लग्न आहे, आणि तो स्वतःच्या ऑफिस कामासाठी आता काहीच दिवसात म्हणजे १ जुलैला टर्कीला जायला निघणार आहे. ते पण एक महिना. 'पोस्पॉन्ड कर म्हणाले,' तर 'अजिबात पॉसिबल नाही,' म्हणत हात वर केले. म्हणजे याच करिअर महत्वाचं आणि माझं काय?' रोजचे हेच विचार तिच्या मनात यायचे. पण शेवटी, 'तोच मला आठवणीने फोन करतो. काळजी करतो. मग ठीक आहे.' या वाक्याने सगळ्याचा शेवट व्हायचा.

*****

"हॅलो, हो जस्ट बॉक्स पॅक केला. मी निघतेच आहे."

"ओके. मी सुध्दा निघालो. पण तो बॉक्स कशासाठी?"

"भेटल्यावर सांगते."

"ओके हनी."

"बाय."

फोन कट करून पिनीने एकदा बॉक्सवर नजर फिरवली. 'एका मोठ्या बॉक्समध्ये सगळ्या वस्तू, विराजने दिलेले सगळे गिफ्ट्स पॅक करून झाले. पण आठवणींचं काय? त्या पॅक करून ज्याच्या त्याला रिटर्न करता येत नाहीत ना. काश तस करता आलं असत.' या विचारात तो बॉक्स डिकीत ठेवून तिने गाडी स्टार्ट केली.

'माझ्या करिअरसाठी मी खूप मेहनत घेतली आहे. तसही अजून आमचं लग्न झालेलं नाहीये. अजूनही वेळ गेलेली नाही. तेव्हा गोष्टी पुढे वाढू न देता आहेत तिथेच थांबवणे योग्य. विराजला कल्पनासुद्ध्या नसेल याची. पण हरकत नाही. मी समजावेन त्याला. समजून घ्यावच लागेल. यापुढे मला कोणतंही कॉम्प्रोमाइज करायचं नाहीये. आणि त्याच्यासाठी माझ्यापेक्षा त्याच करिअर महत्वाचं आहे, हे सुध्दा मला वेळीच लक्षात आल, ते एक बार झालं. दरवेळेसची भांडण आणि मग रुसवे फुगवे, कंटाळा आलाय याचा. अजिबात इमोशनल होणार नाहीये मी आणि आज सगळ्याचा शेवट करणार आहे.'

स्वतःशी चाललेली बडबड थांबवून पिनीने गाडीला ब्रेक लावला. त्याच्या गाडीच्या बरोबर विरुद्ध दिशेला गाडी पार्क करून ती उतरली.

विराजची गाडी कॅम्प रोडला एका बाजूला उभी होती. त्या दोघांचं याआधीच रोजचं भेटण्याचं ठिकाण. डोक्यावरच्या उंच आभाळात मस्त बहावा चोहोदिशांत बहरत असे, त्याच्या फुलांच्या पिवळसर सडयाची चादर ओढलेला तो सुमसान रस्ता, म्हणजे पिनीची आवडती जागा. ते दोघे तिथे भेटले की पाच-दहा मिनिटे ती अगदी-अगदी शांतपणे तल्लीन होऊन त्या बहाव्याच्या आस्वाद घ्यायची.

समोर हाताची घडी घालून गाडीला टेकलेलया अवस्थेत विराज तिचीच वाट बघत होता.

ती त्याचा दिशेने चालत येईपर्यंत पावसाची एक हलकीशी सर उडत-उडत त्यांच्या डोक्यावरून निघूनही गेली होती.

"काय परफेक्ट टायमिंग आहे. १५ मिनिटे झाले, मी इथे तुझी वाट बघत थांबलोय, आणि तुझी एंट्री झाली नाही तोच पाऊस सुरु झाला. हा रस्ता, भरभरून फुलणारा बहावा, तू आणि पाऊस...काहीतरी गुपित आहे राव."

एक हलकीशी स्माईल देत विराजने तिच्या नाकावर लांबूनच एक टिचकी मारली.

"हा शांत रस्ता, भरभरून फुलणारा बहावा, वाट बघणारा तू, अकाली बरसणारा पाऊस आणि नेमहीच उशीरा येणारी मी, हेच तर गुपित आहे ना."   ति ही हाताची घडी घालत त्याच्या शेजारी येऊन गाडीला टेकली.

"म्हणजे ॲंग्री आहेस तर, तुला नेमहीच उशीर होतो."

"कदाचित यापुढे मला उशीर होणार नाही. आणि तुला कधीच वाट पाहावी लागणार नाही." आपल्या हाताची थरथर थांबवण्याचा आटोकाट पर्यंत करत पिनीने डायरेक्ट विषयाला हात घातला.

"थॅट्स गुड. मी सुध्या तेच म्हणतो. ऑल इज वेल. देन वि कॅन थिंक अबाउट इट."

'म्हणजे तू सुद्धा तोच विचार करतोयस?"   पिनीने अति आच्छर्याने प्रश्न केला.

"फक्त विचार नाही. मी तर लग्नाची डेट सुध्या कम्फर्म करणार होतो. बट विचार केला, आधी तुझं शेड्युल कसं आहे ते बघून ठरवूयात. काय म्हणते?"

आपल्या खिशातील एक किटकॅट आणि एक छोटस रेड रोज तिला देत, विराजने एक स्माईल दिली. पिनीला काय बोलावे सुचेना. आता कुठे तिच्या लक्षात आलं, की आपण एक विचार करतोय, आणि हा तर दुसराच विचार करतोय. ते रेड रोज नाजूक हाताने गोंजारत तिने सेकंदासाठो डोळे मिटले. सगळी शक्ती एकवटून आता ती सज्ज झाली.

"मी काय म्हणते विराज. बी सिरिअस अँड प्रॅक्टिकली. बघ...हल्ली आपली रोज भांडण होतात. एकमेकांच्या खूप साऱ्या गोष्टी एकमेकांना खटकतात, आपलं प्रोफेशनही डिफ्रन्ट आहे, त्यामुळे नंतर कदाचित आपण एकमेकांना जास्त वेळही देऊ शकणार नाही. नंतर हेच छोटे छोटे प्रॉब्लेम्स मोठे होत जातील आणि ताण-तणाव वाढेल. सो... "   तिने एक दीर्घ श्वास घेतला. आणि वाक्य पूर्ण करण्याचा आधीच त्याने रागाने तिच्याकडे बघत प्रश्न केला.

"वॉट सो? हान. हे सगळं होतच असत गं. म्हणून तर आपण गेली तीन-चार वर्षे थांबलो ना. अजून थांबायचं असं म्हणायचं आहे का तुला? आणि किती वेळ थांबायचं ? त्याने प्रॉब्लेम्स सॉल्व्ह होतील?"

पिनीला काय बोलावं आणि याला आपला डिसिजन कसा समजवावं हेच कळेना. तिने आपल्या बोटातली एंगेजमेंट रिंग हातात काढून ती घट्ट मुठीत आवळली. विराजला परत देऊन सरळ इथून निघून जाऊया, या विचारात असतानाच एक लखलखती वीज कडाडली, आणि धो धो करून तोच अकाली पाऊस पुन्हा एकदा बरसू लागला.

विराजला काही कळायच्या आत पिनीने उघडली मूठ तशीच दाबली. "गाडीत बसून बोलूया." म्हणत ती आपल्या गाडीकडे वळणार तोच विराजने तिचा हात पकडला होता.

"थांबते का? थोडं भिजूया म्हणतो आज. त्याने किमान तुझ्या मनावर जमा झालेले मभळ वाहून जाईल."

"पण तुला पाऊस आवडत नाही ना." म्हणत पिनीने आपला हात सोडवून घेतला.

"पाऊस मला आवडत नाहीच. पण तू आवडतेस. आणि तुला आवडत असलेली प्रत्येक गोष्ट मी आवडून घेतो."

त्याच्या त्या शब्दासरशी पिनी गर्रकन मागे वळली होती. "काल एक तास भांडत होतो आपण. त्याने माझी फॅमिली सुध्या डिस्टर्ब् आहे. हल्ली हे असं रोजच होतंय. त्यापेक्षा इथेच थांबूया हे सगळं."

जवळ येत एक बोट पिनीच्या ओठांवर ठेवत विराजने तिला चूप केले. "मी एक वेगळा विचार करतोय, आणि तुझ्या डोक्यात काहीतरी वेगळंच सुरु आहे. त्याचा विचारही मी करु शकत नाही. सगळं इथेच थांबवणं, हा एकच पर्याय नाहीये. सो थिंक पॉसिटीव्ह. थोडं तुझं थोडं माझं... असं दोघांनी एकमेकांना वेळ देऊ. मिळून सगळ्याचा बॅलन्स करूयात."

"आणि जर ते नाही जमलं तर?" पिनीने त्याला थांबवत मध्येच प्रश्न केला.

"जर आपल्या दोघांचं एकमेकांशी नाही जमल, तर दुसऱ्या कोणाबरोबर ते जमेल याची काय गॅरेंटी?"

यावर पिनिच्या तोंडातून एकच शब्द बाहेर पडला. "सॉरी." तिचा निर्णय ठाम होता. 'थोडं तुझं थोडं माझं,' म्हणतो हा पण कॉम्प्रोमाइज करायची वेळ आली की मात्र ते मला करावं लागत. लग्नासाठी एका वर्ष माझं करिअर मी सोडणार नाही.

'मनात काहीतरी पक्के करून ती पुन्हा गाडीकडे वळली. तो बॉक्स त्याचा स्वाधीन करून तिथून निघण्यासाठी... तिने बॉक्स काढण्यासाठी डिकी उघडली, आणि क्षणात धाडकन बंदही केली. कारण डिकी उघडताना तिचे हातातल्या घड्याळाकडे सहजच लक्ष गेले. त्यावर तारीख होती १ जुलै. ती धावतच विराजकडे आली. तो तसाच पावसात भिजत शांत उभा होता. आपले दोन्ही हात पसरून तिच्याकडे बघत.

"सरप्राईज म्हणून एक बॉक्स घेऊन येणार होतीस ना? त्याच काय ?"

"काही नाही. घरीच विसरले तो मी. पण टर्की ट्रिप कॅन्सल करून तूच मला सरप्राईज केलस." म्हणत पिनी पळत जाऊन सरळ त्याच्या मिठीत शिरली.

"आलं का लक्षात? थोडं तुझं थोडं माझं." म्हणत तोही पुन्हा हसला.

हीच तर खरी गंमत आहे या अकाली बरसणाऱ्या पावसाची...
हा शांत रस्ता, भरभरून फुलणारा बहावा, वाट बघणारा तो आणि उशीरा का होईना पण नेहमी न चुकता येणारी ती.



# पॉम्फ्रेट तिखलं (ऑइल फ्री)

*' तिखलं हा एक मालवणी पदार्थ. पण पावसाळ्यात मिळणाऱ्या ताज्या-ताज्या माश्याच तिखलं कोकणात अगदी घरोघरी केल जात. आंबट, तिखट असा हा अगदी चमचमीत मासळीचा प्रकार. नुसत्या नावानेच जिभेला पाणी सुटल्याशिवाय रहात नाही.'*

**मॅरिनेट करण्यासाठी लागणारी सामुग्री - हाताच्या आकाराचे १ पॉम्फ्रेट स्वछ धुवून साफ करून घावे, त्यावर सुरीने आडवे दोन कट द्यावे. यावर प्रत्येकी अर्धा छोटा चमचा हळद, लाल तिखट, कोकम रस/ आगळ आणि १ चमचा मीठ हे सर्व व्यवस्थित लावून झाकून १५-२० मिनिटे फ्रिजमध्ये ठेवावे.(अगदी छोटा चमचा घ्यावा,त्याचा आकार साहित्य चित्रामध्ये दाखवला आहे.)**

**तिखलं मसाला साहित्य- लसणीच्या २-३ पाकळ्या बारीक चिरून, मूठभर स्वच्छ धुतलेली कोथींबीर, १-२ हिरवी मिरच्या, १ कोकम साल. लाल तिखट चविला+रंगाला प्रत्येकी २ चमचे, गरम मसाला १ चमचा, कांदा-लसूण मसाला असेल तर १ मोठा चमचा. थोडेसे पाणी.**

**कृती- मॅरिनेट केलेल्या पॉम्फ्रेटला एका कढईमध्ये घ्या. त्यावर वरील सर्व साहित्य लावा. थोडे शिजण्यापुरते पाणी घालून वरती एक झाकण ठेवून पलटी न करता तसेच १० मिनिट शिजवून गॅस बंद करावा. थोडी कोथींबीर वरुन भुरभुरवी व चमचमित पॉम्फ्रेट तिखलं भाकरी बरोबर सर्व करा.**
**थोडे पाणी घातल्याने पॉम्फ्रेट दोन्ही बाजूंनी व्यवस्थित शिजते, जास्त शिजवण्याची गरज लागत नाही. या प्रकारे ओला बांगडा आणि हलवा वगैरे मासे छान होतात.**

**विशेष - या प्रकारामध्ये आपण अजिबात तेल वापरले नाही. प्रत्येक माश्याला स्वतःचे तेल असतेच तेवढे पुरे आहे. ज्यांना डॉक्टरने जेवणातील तेल कमी करण्याचा सल्ला दिला असेल तर त्यांच्यासाठी हा प्रकार उत्तम आहे.**



# मिरगाचा पाऊस

"निमा! तांदळाची भाकर करते ना ग? आणि हो... थोडं सुक्या करदीच कालवण त्याबरोबर खाऱ्या बांगड्याच तोंडीलावणं पाहिजेच. नाहीतर जेवायची नाही हो ती."    अप्पांनी हसत-हसत फर्मान सोडला होता.

"होय. आप्पा सगळं करते."    निमाही रोजच्याच सवयीप्रमाणे बोलून गेली.

"आणि ते ..."

"हो. हो... समजलं आप्पा. करदीच्या कालवणात कच्च्या कैरीच्या चार फोडी टाकायच्या, कोकम नाही. त्याने चव बिघडते. बरोबर ना?"

तिच्या या वाक्यावर दोघेही मनसोक्त हसले.

"कैरी नसेल तर आंब्याची वाळलेली दोन आमसूल टाकायची. झकास बेत होईल."    म्हणत आप्पा उठून पडवीत आले. अंगणातून समोरच्या बेड्याची टेहळणी करत त्यांनी नकारार्थी मान डोलावली.

जेमतेम अर्धी घटिका सरते न सरते तोच त्यांनी पुन्हा थरथरत्या पावलांनी स्वयंपाक घरात डोकावत कानोसा घेतला.  "निमा! उद्याच किश्याला चढणीचे मासे सांगून ठेवतो. दोन दिवसात आणून देईल तो. करशील ना?"

"हो आप्पा करेन. माईंना मासे खूप आवडतात ना... माहीत आहे मला."

"तिच लुगडी-चोळी आणि गोधड्या वगैरे सगळं चांगलं धुवून ठेवलंस काय?"

"आप्पा अहो सगळी तयारी झाली... सकाळपासून दाराला डोळे लावून आहात. आत्ता येईल..आत्ता येईल म्हणून, थोडं आराम करता का?"

निमाने आराम खुर्ची समोर करत, आपल्या हातांचा आधार देत त्यांना बसवले. त्यांच्या हातातील लाकडी काठी खाली ठेवून खांद्यावचा छोटासा हातरुमाल घेऊन कपाळावरचा घाम पुसला.

आप्पांचे मात्र त्यांच्या जाडजूड चष्म्याच्या कडेतून दाराकडे लक्ष होते.

"बघ जरा पंचांगात... मिरग चालू झालं ना? उद्या नक्षत्र बदलतंय. आज आलीच पाहिजे ती.... आलीच पाहिजे."

नेहमीप्रमाणे त्यांची एकट्याचीच बडबड चालू होती. सारखं-सारखं दाराकडे बघून त्यांची बेचैनी वाढत चालली. ते पाहून निमाचे डोळे पाणावले. त्यांच्या नकळत तिने पदराने डोळ्याचा कडा टिपल्या आणि ती स्वयंपाक घराकडे वळली.

'आज दोन आठवडे हे असच चालू होत. झालं उद्या पासून सगळं ठीक होईल. कसबस अजून एक दिवस ढकलायचा होता. माईंचं लुगडी-चोळी, दोन जाडजूड गोधड्या आणि पानांची चंची सार साहित्य उचलून लाकडी पेटाऱ्यात भरत तिने पेटारा बंद केला.

"व्यवस्थित घडी करून ठेवलं पाहिजे हो. परत पुढच्या मिरगात काढावं लागेल." स्वतःशीच पुटपुटत तिने दोन ताटं वाढायला घेतली. आणि बाहेर पावसाची रिपरिप चालू झाली. खिडकीतून पावसाकडे बघत तिने एक समाधानाकारक उसासा दिला. " वेळेवर आलास रे बाबा! नाहीतर माझ्यावर धर्मसंकट कोसळले असते." असे मनातल्या मनात म्हणत तिने चौरंगावर एक ताट लावून आपांना आवाज दिला.

"आप्पा चला जेवून घ्या."

"जेवायला काय वाढ़तेस. ती येईल एवढ्यात मग एकत्र बसुया ना."

"आप्पा त्यांना उशीर होईल. त्या संध्याकाळीच येतील बहुतेक. बाहेर पाऊस बघा काय आहे तो." बाहेरच्या पावसाकडे बोट दाखवत निमाने त्यांची समजूत काढली.

"असं कसं? 'यंदाच्या मिरगात तिला सोडायला येतो. 'असं बोलला ना बाळ्या. मग यायलाच पाहिजे. यायलाच पाहिजे. घेऊन कशाला गेला? का घेऊन गेला? तेही मला न विचारता." आपांचा पारा अचानक चढला होता. वाढलेले ताट बाजूला सारून ते अचानक उठून दाराच्या दिशेने निघाले.

"आप्पा शांत व्हा. येतील ते संध्याकाळी माईंना घेऊन. पाऊस जास्त आहे आणि आपल्या गावाला यायला एक रस्ता. त्यावरील लाकडी साकव देखील डळमळीत झालाय. थोडा पाऊस वाढला तरीही तो बंद करून ठेवतात. त्यामुळे उशीर झाला असेल."

निमाने त्यांना हाताला धरून पुन्हा आत आणले. पण आप्पा मात्र आता खूपच चिडले होते. त्यांची थरथर वाढली. कपाळावर भर पावसात घाम फुटला होता. श्वसनाचा वेगही वाढू लागला होता.

"संध्याकाळी येईल म्हणतेस. अजून राखण द्यायची बाकी आहे ना. आज मिरगाचा शेवट ग. काहीही करून आजच संध्याकाळी राखण द्यावी लागेल. आलाच पाहिजे.... आलाच पाहिजे. कोंबडा कोण कापणार ? आणि रसरशीत काळ्या वाटणातली गावठी कोंबडी खावी तर माईच्या हातचीच. वर्ष सरले ना? तिच्या हाताचा रस्सा चाखून. "

असबंध बडबड करून आप्पा पुन्हा भूतकाळात शिरले. आणि नेहमीप्रमाणे त्याच गोष्टीचा फायदा घेऊन निमाने त्यांना ताटातले चार घास भरवले देखील. नाहीतर जेवणाची आणि त्यांची गाठ पडणे मुश्किल व्हायचे. त्यांचे रिकामे ताट आणि स्वतःचे रिकामे पोट, तरीही ती समाधानाने आत वळली. मिरग आले कि तिच्या कितीतरी आठवणी जाग्या व्हायच्या. कितीतरी जखमांच्या खपल्या निघायच्या. पंधरा दिवसाच्या या नक्षत्राने तिला आयुष्यभर पुरेल एवढा पाऊस दिला होता. त्यात होते ते काठोनकाठ भरलेले दुःख, ओसंडून वाहणाऱ्या वेदना, आणि भळभळणारी जखम. याच विचारांत ते रिकामे ताट तिने घासून टाकले, जसे आपले रिकामे आयुष्य ती रोज घासायची, पुन्हा नव्याने चकचकीत करण्यासाठी.

एवढ्यात कसल्याश्या धाड धाड आवाजाने तिची तंद्री भंग झाली. हातातले भांडे तसेच टाकून तीने माजघराच्या दिशेने धाव घेतली, आणि समोरच आप्पांना जमिनीवर कोसळलेले पाहून तिच्या काळजाचे पाणी पाणी झाले.

"आप्पा...आप्पा उठा! काय झालं?"

कसेबसे उठवण्याचा प्रयत्न करत तिने बाजूच्या तांब्यातील थोडे पाणी त्यांचा तोंडावर शिंपडले. परत हृदय विकाराचा झटका आला की काय? या विचाराने तिच्या पोटात गोळा आला होता. नक्की काय करावे तिला कळेना म्हणून शेजारच्या तात्यांना आवाज द्यायाला ती उठली, एवढ्यात आपांनी तिचा हात घट्ट पकडला होता. त्यांचे पांढरेफट डोळे तिच्यावरतीच रोखलेले होते.

"निमे, बाळ्याने तुझ्या आयुष्याची माती केली पोरी. माझा लेक असला म्हणून काय झालं ग. शहरात दुसरा संसार थाटून मोकळा झाला... आणि तू इथेच राहिली आमची सेवा करत. एवढं करून त्याच समाधान होईना की काय, ते त्याच्या पोराला सांभाळायला माझ्या माईला घेऊन गेला... भाड्???"

एक सणसणीत शिवी हासडून आप्पा पुन्हा शांत झाले.

"मी मिरगाची वाट बघत बसलो अन कळलं की चार महिने झाले, माई केव्हाचीच मला सोडून गेली. कायमचीच. नालायकाने कळवलं पण नाही... शेवटची भेट पण होऊ दिली नाही." आप्पा बोलता बोलता रडू लागले. त्यांना दोन वर्षापूर्वीचे सारे काही आठवले होते. ते ही स्वतःहून...

'निदान पुढच्या मिरगात तरी माईच्या येण्याची आस धरून बसणार नाहीत ते. आणि मला पण आता खोट बोलण्याची गरज नाही.' या विचाराने निमाला हायसे वाटले.

"पोरी बाळ्याला देव कधीच माप करणार नाही.कधीच." म्हणत आप्पा पुन्हा मूर्च्छित पडले.

*****

दुपारपासून आप्पांची तब्येत बिघडत चालली होती. रात्रभर निमा त्यांच्या बाजूला बसून राहिली. सकाळी केव्हातरी निमाचा डोळा लागला होता. उठायला खर तर फारच उशीर झाला, पण सतत कोs, कोss, कोss, कोssss करून ओरडणाऱ्या कोंबड्यांच्या आरवण्याने ती उठली. चुलीवर चहासाठी पाण्याचे आंदन ठेवून ती परसात वळली, तिला आश्चर्य वाटले कारण समोर आप्पा आपल्या थरथरत्या हातानी पाण्याच्या बंबाखाली सरपणाचा जाळ करत होते. धुराचे लोट हवेत वरती विरून जात होते.

"आप्पा लवकर उठलात? कसं वाटतंय आता ?"   निमा दोन सुकी लाकडं पाण्याखाली सरकवत त्यांच्या बाजूला जाऊन बसली.

हातातील मिसरी बोटाने चोळत आप्पांनी नकारार्थी मान डोलावली. "यंदाच्या वर्ष्याला पण बाळ्याने फसवलं ना ग. काल संपला मिरग... पण माझ्या माईला घेऊन आला नाही तो."

त्यांचे शब्द ऐकताच ती मिनिटभर सुन्न झाली. स्वतःला सावरत, "येतील हो पुढच्या मिरगात." म्हणत तीने डोक्याला हात लावला.

"काय झालं ग?"  तिचा तो उतरलेला चेहेरा पाहून आप्पांनी प्रश्न केला.

"काही नाही हो. आज सकाळ सकाळ पावसाळा सुरुवात झाली बघा."  म्हणत तिने बाहेर छपरावरून खाली मागीलदारी पडणाऱ्या जलधारांकडे बोट दाखवले. स्वतःचे दुःख बाजूला सारून ती पुन्हा एकदा पुढच्या मिरगाच्या प्रतीक्षेसाठी सज्ज झाली. कारण माईला भेटण्याची आप्पांची आस काही केल्या सरेना. त्यामुळे आता परत पुढच्या मिरगाची वाट बघणे आलेच.



# बेसन झुणका

*पावसाळा सुरु झाला की, गरम-गरम बेसन झुणका आणि भाकरीचा बेत एकदातरी झालाच पाहिजे. आहा... स्वर्गसुखच म्हणा ना.*

साहित्य - १ वाटी बेसन पिठ, तीन वाट्या पाणी, वाटीभर कोथिंबीर.

फोडणीसाठी साहित्य - ३-४ टेबलस्पून तेल, एक टिस्पून मोहोरी, चिमूटभर हिंग.
५-६ लसूण पाकळ्या, ५-६ पाने कढीपत्ता, १ कांदा, १ टोमॅटो, २ हिरव्या मिरच्या, अर्धा इंच आद्रक सर्व साहित्य जमेल तेवढे अगदी बारीक चिरून घ्या.
एक टिस्पून हळद, दोन टिस्पून लाल तिखट, एक टिस्पून मीठ.



कृती- १ वाटी बेसन पिठामध्ये तीन वाट्या पाणी घालून पातळ मिश्रण तयार करा.यात गुठळ्या होऊ द्यायच्या नाहीत. यामध्ये मूठभर चिरलेली कोथिंबीर मिक्स करून बाजूला ठेवून द्या.

एका कढईमध्ये तेल घेऊन ते कडकडीत गरम झाले की, मोहोरी घालावी ती तडतडल्या नंतर यात हिंग,लसूण,कढीपत्ता,कांदा,टोमॅटो,मिरची,आद्रक  हे साहित्य लालसर परतून घावे. मिश्रणाला तेल सुट्टू लागले की मग यात हळद,निखत,मीठ घालून दोन मिनिट एकसारखे परतावे. सर्व साहित्य शिजून व्यवस्थित एकजीव झाल्यानंतर यात वरून बेसन-पाणी-कोथिंबीर मिश्रण घालावे  व एकसारखे मिक्स करून घ्यावे. आता मोठा चमचा घेऊन पाच मिनिट सतत हे मिश्रण ढवळत रहावे.अन्यथा ते खाली चिकटून राहण्याची शक्यता असते. कढईवर झाकण ठेवून बेसन मंद आचेवर शिजू द्यावे. पातळ मिश्रण अगदी घट्ट होईपर्यंत मध्येमध्ये ढवळावे म्हणजे करपणार नाही. साधारण ५-१० मिनिटात झुणका तयार होतो.

असा साधासुधा पण लज्जतदार बेत या पावसाळ्यात एकदातरी होऊन जायदया.

*'गरमा-गरम झुणका भाकरी सोबत एखादा पापड आणि बारीक चिरलेला कांदा.'*



